//१४//

**विशेष दिवाणी दावा क्र. १७/२०२४**
मनिषा वि. कार्यकारी अभियंता
निशाणी क्रमांक **१८ खाली**

**<u>वादी तर्फे साक्षीदार क्र. १ रोहित भालचंद्र घोगरे यांचा शपथेवर पुढील सरतपास अॅड. एस. एन. माने यांच्यामार्फत सुरु</u>**

१. माझ्या पुराव्याच्या शपथपत्रातील संपुर्ण मजकुर खरा व बरोबर असून त्यावर माझी सही आहे. पुराव्याकामी दिनांक २९.०७.२०२४ रोजी माझा भाऊ ओंकार घोगरे यांनी सहाय्यक पोलिस निरीक्षक, पोलीस ठाणे अंबी यांना दिलेल्या तक्रारी अर्जाची प्रत दाखल केली असून त्यावर माझा भाऊ घोगरे याची स्वाक्षरी आहे. सदरचा अर्ज **<u>निशाणी क्रमांक २५</u>** वर आहे. दिनांक १३.०७.२०२४ रोजी पोलीस ठाणे अंबी यांनी माझे मयत वडील भालचंद्र सुदाम घोगरे यांचा अप्राकृतिक मृत्यू झाल्याबाबतची नोंद करुन घेतलेबाबतच्या अहवालाची साक्षांकित प्रत **<u>निशाणी क्रमांक २६</u>** वर आहे. घटनास्थळ पंचनाम्याची साक्षांकित प्रत **<u>निशाणी क्रमांक २७</u>** वर आहे. मरणोत्तर पंचनाम्याची साक्षांकित प्रत **<u>निशाणी क्रमांक २८ व २९</u>** वर आहे. दिनांक २३.०९.२०२४ रोजी प्रतिवादींना वकीलामार्फत पाठवून दिलेल्या नोटीसची स्थळप्रत दाखल केली असून त्यावर आम्हा सर्व वादींच्या स्वाक्षऱ्या आहेत. सदर नोटीस **<u>निशाणी क्रमांक ३०</u>** वर आहे. नोटीसची प्रत प्रतिवादींना आर. पी. ए. डी. ने पाठविलेली पोस्टाची पावती **<u>निशणी क्रमांक ३१</u>** वर आहे. नोटीस मिळाले बाबतची पावती **<u>निशाणी क्रमांक ३२</u>** वर आहे. दिनांक २२.१०.२०२४ रोजी प्रतिवादीस पाठवून दिलेलया नोटीसची स्थळप्रत दाखल केली असून त्यावर माझी स्वाक्षरी आहे. सदरची नोटीस **<u>निशाणी क्रमांक ३३</u>** वर आहे. मौजे जगदळवाडी येथील गट क्रमांक २०० मध्ये मयत भालचंद्र घोगरे यांच्या नावे असलेल्या जमिनीची एकुण ६ फोटो दाखल केले असून ते सर्व फोटो आर्टिकल **<u>'१ ते ६'</u>** वर आहे. मयत

भालचंद्र घोगरे यांच्या नावे असलेल्या जमिनीचा ८ अ चा सातबारा उताऱ्याच्या प्रमाणित प्रती अनुक्रमे **निशाणी क्रमांक ३४ व ३५** वर आहेत. माझ्या वडीलांच्या नावे असलेले बँक खाते उताऱ्याच्या प्रती मी दाखल केलेल्या आहेत. माझ्या वडीलांच्या नावे असलेले पगारपत्रकाच्या प्रती मी दाखल केल्या आहेत.

**प्रतिवादी क्रमांक २ व ३ तर्फे उलटतपास अॅड. एस. पी. भालेराव यांच्याकडून**

२. हे म्हणणे खरे नाही की, मयत भालचंद्र घोगरे हे भारतीय सैन्यात नोकरीस होते आणि ते सन २००६ ला सेवानिवृत्त झाले होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की मयत भालचंद्र घोगरे यांना दरमहा सेवानिवृत्त वेतन रुपये ३६९१३/– मिळत होते आणि ती रक्कम भारतीय स्टेट बँक शाखा परंडा येथील त्यांच्या खात्यात जमा होत होती, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, भालचंद्र घोगरे हे सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांना कुर्डूवाडी येथे पोलिस कॉन्सटेबल म्हणून कार्यरत होते, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, रेल्वे विभागाकडून त्यांना दरमहा रुपये ७२,०००/– पगार मिळत होता आणि टॅक्स कपात होऊन निव्वळ रक्कम ५७,१६८/–त्यांच्या बँक खात्यात जमा होत होती, हे मी खोटे सांगत आहे.

३. भालचंद्र घोगरे यांच्या नावे भारतीय सैन्य दलात नेमणुक झाल्याबाबतचे कागदपत्र मी दाखल केले आहेत. ते सैन्य दलातुन निवृत्त झाल्याबाबतचे कागदपत्र देखील मी दाखल केले आहेत. भालचंद्र घोगरे यांना सेवानिवृत्त वेतन मिळत होते, याबाबतचे लेखी कागदत्र मी दाखल केले आहेत. तसेच पी. पी. ओ आदेशाची प्रत देखील मी दाखल केलेली आहे. आमचे मुळ गाव डोंजा ता. परंडा आहे. हे म्हणणे खरे नाही की आम्ही सर्व लोक पुणे येथे

राहण्यासाठी होतो. हे म्हणणे खरे नाही की माझ्या वडीलांच्या डोळयात दोष होता म्हणून त्यांना कमी दिसत होते. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडीलांच्या दोन्ही डोळयात दोष असल्याकारणाने ते सरळ पाहत नव्हते.

४. हे म्हणणे खरे नाही की मौजे जगदळवाडी येथील शेतजमीन माझे वडील स्वतः पाहत नव्हते. सदर शेतजमीनीस विद्युत पुरवठा घेण्यात आल्याबाबतचे कागदपत्र मी जोडले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सदर शेतजमीनीत असलेले विद्युत पोल वाकलेले होते त्यामुळे तार खाली आलेली होती, हे मी खोटे सांगत आहे. शेतातील घटना घडण्याच्या दोन महिन्यापुर्वीपासून विद्युत पोल वाकून त्याची तार खाली आलेली होती. मी व माझ्या वडीलांनी आमच्या शेतातील विद्युत पोल वाकलेले व त्यामुळे तार खाली असल्याचे पाहिले होते. माझे वडील भालचंद्र यांनी शेतातील वाकलेले पोल व तार दुरुस्त करुन मिळावे म्हणून प्रतिवादी यांच्या कार्यालयात तक्रारी अर्ज दिलेला होता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांनी प्रतिवादी यांच्या कार्यालयात लेखी तक्रार दिलेली होती हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की मी व माझ्या वडीलांनी प्रतिवादीच्या कर्यालयात जाऊन संबंधीत अधिकाऱ्याला तोंडी स्वरुपात देखील तक्रार केली होती, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की आमच्या शेतातील तार खाली आल्यामुळे त्याठिकाणी जाणे टाळले पाहिजे आणि त्या ठिकाणी जायला नाही पाहिजे होते. हे म्हणणे खरे नाही की, ज्या ठिकाणी तार खाली पडलेली होती त्याठिकाणी माझे वडील त्याठिकाणी गेले होते. घटनेच्या दिवशी माझे वडील शेतातील पिकांना फवारणी करण्याकरिता गेले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांच्या निष्काळजीपणामुळे त्यांना विद्युत झटका लागला. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडील स्वतः त्यांच्या मृत्यूस जबाबदार

आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांचा मृत्यू नैसर्गिकरित्या झालेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही संबंधीत पोलिस अधिकाऱ्याशी संगणमत करुन अनैसर्गिक मृत्यूची नोंद करुन घेतलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही संबंधीत डॉक्टरांशी संगणमत करुन खोटया मजकुराचा मरणोत्तर अहवाल तयार करुन घेतलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांना शेतजमिनीपासून दरसाल दोन लाखांचे उत्पन्न मिळत होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या वडीलांच्या मृत्यूमुळे आमचे कुटूंबाचे आर्थिक नुकसान झाले आहे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही अवाजवी रुपये दीड कोटी नुकसान भरपाईची मागणी केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की आम्ही विद्युत बिल बुडविण्यासाठी प्रतिवादींच्या कर्मचाऱ्यांना धमकावित आहे. घटनेच्या दिवशी शेतात माझे वडील एकटेच होते. हे म्हणणे खरे नाही की माझ्या वडीलांचा मृत्यू विद्युत तारेच्या झटक्यामुळे झालेला आहे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी यांच्याकडून नुकसान भरपाई मिळविण्याकरिता आम्ही वादींनी खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही प्रतिवादींना खोटया मजकुराच्या नोटीस पाठविल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

ABDUL KARIM ABDUL RAHIMAN SHAIKH

Digitally signed by ABDUL KARIM ABDUL RAHIMAN SHAIKH
Date: 2025.11.13 11:38:30 +0530

दिनांकः–११.११.२०२५

**अ. अ. शेख**

दिवाणी न्यायाधीश व. स्तर, परंडा

CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F file Judgment/Order/Record and Document are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | - | Vaibhav Mohanrao Ingale<br>Stenographer (Grade-III) |
| Court | - | Civil Court Senior Division, Paranda. |
| Date | - | 11-11-2025 |
| Order signed by the presiding officer on | - | 11-11-2025 |
| Order uploaded on | - | 12-11-2025 |